ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १ जून, १९५५ अंक २२

## विविध माहिती

**तत्त्वज्ञानावरील ग्रंथाला बक्षीस**—भारत कॉलेजच्या संस्कृत-शाखेचे प्रमुख, प्राध्यापक धर्मेंद्रनाथ शास्त्री ह्यांनीं भारतीय तत्त्वज्ञानावरील हिंदी भाषेंतील सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे. ह्या ग्रंथाला १,१०० रुपयांचें हरजीमल दालमिया प्राइझ देण्यांत आलें आहे. त्यांच्या ग्रंथांत न्याय सिद्धांतावर टीकात्मक विवरण करण्यांत आलें आहे.

**पोलाद कारखान्यांतील कामगारांना शिक्षण**—रूरकेला येथें नव्यानें निघणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांत काम करण्यासाठी शिक्षण देण्याची एक तपशीलवार योजना हिंदुस्थान स्टील लि. ह्या कारखान्यानें आखली आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांपैकी कुशलतेचीं कामें करणाऱ्यांना परदेशीं शिक्षण देण्यांत येणार आहे.

**उत्तर-प्रदेशांत विपुल आंबा**—१९४९ सालानंतर कधींहि आलें नव्हतें इतकें विपुल आंब्यांचें पीक ह्या वर्षीं उत्तर-प्रदेशांत आलें आहे. सुमारें पंधरा दिवसांनीं उत्तर हिंदुस्थानांतील बाजारपेठांत हा आंबा मोठ्या प्रमाणावर येऊं लागेल. राज्य-सरकार आंब्यांचीं पार्सलें विमानानें ब्रिटनमध्यें व युरोपमध्यें पाठविण्याचा विचार करीत आहे.

**बंगलोरचा पाणी-पुरवठा**—बंगलोर शहराच्या पाणी-पुरवठ्यांत आणि ड्रेनेजच्या पद्धतींत सुधारणा करण्यासाठी ५०,४७,००० रुपये मिळावे अशी विनंति बंगलोर म्युनिसिपल कॉर्पोरेशनतर्फे अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांना करण्यांत आली आहे. ह्यापैकी निम्मी रक्कम कर्ज म्हणून व बाकीची मदत म्हणून देण्यांत यावी, असें कॉर्पोरेशनचें म्हणणें आहे.

**महाड येथें तांत्रिक शिक्षणाची शाळा**—प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य शहरांत तांत्रिक शिक्षणाची शाळा काढण्याच्या मुंबई सरकारच्या धोरणाप्रमाणें महाड येथें अशी शाळा उघडण्यांत येणार आहे. वास्तविक ही शाळा अलिबाग येथें निघावयास पाहिजे. पण अलिबाग येथें वेधशाळा असल्यामुळें आसपासच्या तीन मैलांच्या परिसरांत वीज उत्पन्न करतां येत नाहीं. म्हणून महाड येथें शाळा काढण्याचें ठरलें आहे.

**कृत्रिम रेशमाचा नवा कारखाना**—मुंबई येथें कृत्रिम रेशमाचा नवा कारखाना काढण्याचें एका भारतीय उद्योगपतीनें ठरविलें आहे. संकल्पित कारखाना देशाची १० टक्के गरज भागवूं शकेल. कारखान्यांत ८०० लोकांना काम मिळेल आणि रोज ५ टन रेशीम तयार होईल. ७० ते ८० लाख किंमतीची यंत्रसामुग्री अमेरिकेहून आणण्यांत येईल.

**इंदूर येथें रेडिओचें केंद्र**—ऑल इंडिआ रेडिओचें इंदूर येथील केंद्र डॉ. बालकृष्ण केसकर ह्यांनीं नुकतेंच खुलें केलें. रेडिओच्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें नव्यानें स्थापण्यांत येणाऱ्या केंद्रांपैकी हें पहिलेंच केंद्र आहे. केंद्राची शक्ति २० किलोवॅटची असून तें मीडिअम ध्वनिलहरींचें आहे.

**सोलापुरांत खुलें थिएटर**— सोलापूर म्युनिसिपालिटीच्या १९५५-५६ सालच्या अंदाजपत्रकांत ११ लाख रुपयांची शिल्लक दाखविण्यांत आली आहे. साफसफाईचें काम करणाऱ्या कामगारांसाठी ५०,००० रुपये खर्चून गाळे बांधण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें खुल्या नाट्यगृहासाठी ६५,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**मध्यप्रदेशांत नवे रस्ते**—मध्य प्रदेश सरकारनें चालू आर्थिक वर्षांत नवे रस्ते तयार करण्यासाठी ७५ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. राज्य सरकारच्या विकास योजनांना मदत म्हणून मध्यवर्ती सरकारनें ३० लाख रुपये मंजूर केले आहेत. आणखी एवढीच रक्कम देण्यांत येईल असा अंदाज आहे.

**तुंगभद्रेवरील नवा पूल**—बनारस ते कन्याकुमारी ह्या रस्त्यावर कुर्नुल गांवाजवळ तुंगभद्रा नदीवर नवीन पूल बांधण्याचें ठरलें आहे. ह्या कामासाठी ४० लाख रुपये खर्च येईल. पुलासाठी लागणारी जमीन ताब्यांत घेणें व सीमेंट-पोलादासारखें नियंत्रित साहित्य मिळविणें, हीं कामें आतां चालूं झालीं आहेत.

**रशिआचें नवें विमान**—पुढील वर्षीं कॅनडांत भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानांच्या प्रदर्शनांत रशिआ आपलें अद्यावत् पद्धतीचें विमान पाठविणार आहे. युद्ध संपल्यापासून पाश्चिमात्य देशांत रशिआचें विमान अशा प्रदर्शनांत दाखविलें जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**भूमिहीनांसाठी नमुनेदार शेतें**—बिहार ॲग्रिकल्चरल फार्म्स इन्क्वायरी कमिटी सरकारला अशी सूचना करणार आहे कीं, राज्यांतील भूमिहीनांना खंडावर देण्यासाठी कांहीं नमुनेदार शेतें तयार करण्यांत यावींत. बिहारमधील शेतकऱ्यांत जमीन नसलेल्या कुटुंबांची संख्या शेंकडा सुमारें २२ आहे.

**मलेरिआविरुद्ध मोहीम**—काश्मीरच्या सरकारनें पुढील महिन्यापासून जम्मूमध्यें मलेरिआविरुद्ध मोहीम सुरू करण्याचें ठरविलें आहे. जूनच्या पहिल्या पंधरवड्यांत सुमारें ३५० खेड्यांतून डी. डी. टी. चे फवारे मारण्याचें काम पुरें केलें जाईल असा अंदाज आहे.

### इराणमधील तेलाची विक्री

इराणमधील तेलाच्या खाणीचा झगडा गेल्या वर्षी मिटल्यानंतर आंतरराष्ट्रीय तेल–कंपन्यांच्या एका गटानें तेलाच्या खाणी पुन्हां चालूं केल्या. त्यावेळीं इराणचें सरकार व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा गट ह्यांच्यामध्यें करार करण्यांत आला. करारांत ठरल्याप्रमाणें तेलाच्या एकूण उत्पादनापैकी १२॥ टक्के तेल इराणच्या सरकारला मिळावयाचें आहे आणि तें तेल कोणाहि गिऱ्हाइकाला विकण्याची मुभा ठेवण्यांत आली आहे. तथापि ह्या तेलाच्या विक्रीबाबत नॅशनल इराणिअन ऑइल कंपनीच्या चालकांत मतभेद निर्माण झाले आहेत. कांहीं चालकांचें म्हणणें असें आहे कीं, ज्या परकीय कंपन्या इराणपासून तेल विकत घेऊन तें तेल इराणशीं करार केलेल्या तेल–कंपन्यांच्या बाजारपेठांच्या कक्षेच्या बाहेर विकणार असतील अशा परदेशी कंपन्यांशीं स्वतंत्र व वेगवेगळे करार करण्यांत यावेत. असें केल्यानें तेलाला बाजारपेठ मिळविण्याबाबत इराणला अनुभव येईल व हळु हळु स्वतंत्ररीत्या विक्री करतां येऊं लागेल. उलटपक्षी इतर चालकांचें म्हणणें असें आहे कीं, करार केलेल्या तेलाच्या कंपन्यांच्या गटालाच इराणनें आपल्या वांट्याचें तेल विकावें. कारण, ह्या कंपन्या इतर कंपन्यांपेक्षा अधिक चांगली किंमत देण्यास तयार आहेत. अजून इराणच्या वाट्याच्या तेलाच्या विक्रीबाबत निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. दरम्यान डॉ. मुसद्दीक इराणचे पंतप्रधान असतांना झालेल्या कराराप्रमाणें इराण आपलें तेल जपानी व इटालिअन तेल–कंपन्यांना विकत आहे. इराण सरकारला आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या गटाकडून १ कोटी पौंड रॉयल्टी म्हणून मिळाले आहेत.

### मोटारगाडीची लांबी–रुंदी किती असावी ?

अमेरिकेंतील मोटारगाड्यांची लांबी व रुंदी वाढत चालली आहे, आणि ती अशीच वाढत गेल्यास मोटारगाड्यांचे आकारावर नियंत्रणें बसविण्याची पाळी येईल. मोठाल्या गाड्या उभ्या करून ठेवावयाच्या म्हटल्या, तर त्यांना जागा कशी पुरणार ? मोटारींची संख्या वाढत गेली आहे, त्याबरोबर त्यांची लांबी व रुंदीहि वाढली, तर अडचणींतहि वाढ होणें अपरिहार्य आहे. पूर्वीच्या मोटारी मावण्याजोगे तबेले आतां नव्या मोटारींना पुरेनासे झाले आहेत. लोकांचें रहाणीचें मान सुधारत गेलें कीं त्यांच्या मोटारींची अश्वशक्ति व लांबी–रुंदी ह्यांतहि वाढ होत जाते; मोटारगाड्या उभ्या करण्यासाठी राखून ठेवलेल्या जागांत पूर्वीइतक्या मोटारी मावत नाहींत. मोटारींची रुंदी वाढल्यामुळें वहातुकीस अडथळे निर्माण होतात. आपल्या इकडील गांवांतील अरुंद रस्ते व बोळ पूर्वीसारखेच राहिले, पण मोटारींचीं धुडें मात्र विस्तार पावलीं, ह्यांचा होणारा जाच सर्वांच्या परिचयाचा आहे. मोटारमालकाला परवडलें तरी बाकीच्या नागरिकांच्या सोईचाहि विचार झाला पाहिजे. मोटारींच्या वहातुकीमुळेंच एकतर्फी रस्त्यांची आवश्यकता निर्माण होते व त्याचा जाच सायकलवाल्यांना सोसावा लागतो. ही गोष्ट पुणेंकरांच्या तरी परिचयाची आहे. भारतीयांनीं मोठी मोटार निष्कारण वापरणें म्हणजे परदेशाकडे ज्यास्त पैसे सतत देत रहाणें ठरतें, हा मुद्दाहि विचारांत घेण्याजोगा आहे. –'सह्याद्रि'

**मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—विंध्य प्रदेश सरकारनें ८ हमरस्त्यांवरील व ४५ दुय्यम मोटारच्या मार्गावरील प्रवाशांची वाहतूक आपल्या ताब्यांत घेण्याचा विचार चालविला आहे. मध्यवर्ती सरकारकडून स्टेट रोड कॉर्पोरेशन स्थापन करण्यासाठी ३० लाख रुपयांचें कर्ज मागण्यांत येणार आहे.

### भारतांतील मोटारी, बसेस व ट्रक्स

भारतांतील रस्त्यांवर सध्यां खासगी १,५५,२३४ मोटारगाड्या, ३८,७२८ बसेस व ९१,१२५ ट्रॅक्स वहातुक करीत आहेत. त्यांचा राज्यवार तपशील असा:—

| राज्य | खासगी मोटारी | बसेस | मालाच्या ट्रक्स |
|---|---|---|---|
| आसाम | ४,७२८ | १,३१७ | ४,५०७ |
| बिहार | ६,७८३ | १,४१७ | ३,९७८ |
| मुंबई | ३७,३१५ | ४,५११ | १५,०६१ |
| मध्यप्रदेश | ४,५०० | १,२७७ | ३,४६० |
| मद्रास | २३,२२७ | ६,१२८ | ९,३१९ |
| ओरिसा | २,०९७ | ६५६ | २,११० |
| पंजाब | २,८६५ | १,४१३ | ३,००४ |
| यू. पी. | १०,११२ | ३,९७५ | ६,११९ |
| प. बंगाल | २७,२७८ | ८,४२५ | २५,९१८ |
| हैद्राबाद | ७,०९० | १,३४३ | ३,११० |
| जम्मू–काश्मीर | २६० | ४९६ | १,२१२ |
| मध्यभारत | २,०८१ | ५४१ | ९०३ |
| म्हैसूर | ५,५९० | १,०६३ | १,६३० |
| पेप्सु | १,५०० | ८०२ | ७६३ |
| राजस्थान | ४,९५९ | २,११२ | २,९१६ |
| सौराष्ट्र | १,९६६ | ४४५ | १,५३० |
| त्रावणकोर–कोचीन | ३,४३८ | १,६१२ | २,१३१ |
| अजमीर | १,०४० | १२६ | १९८ |
| भोपाळ | ३२१ | ८० | ३४७ |
| दिल्ली | ७,१३५ | ४९० | १,५८६ |
| इतर राज्यें | ९४० | ४९२ | १,५३५ |

**रेल्वेचीं तिकिटें देणारें यंत्र**—ईस्टर्न रेल्वेनें हौरा स्टेशनवर तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना तिकिटें देणारें यंत्र प्रयोग म्हणून बसविण्याचें ठरविलें आहे. यंत्र विजेवर चालणारें असून त्यामधून कांहीं ठराविक स्टेशनांचींच तिकिटें दिलीं जाणार आहेत. ता. ७ जूनपासून १४ दिवसपर्यंत हा प्रयोग केला जाईल. गर्दीच्या वेळीं तिकिटें देण्याच्या कामीं यंत्रामुळें बराच वेळ वांचेल.

**खेड्यांना पाणीपुरवठा**— मध्यप्रदेश सरकारनें २०० खेड्यांची पिण्याच्या पाण्याची व सांडपाण्याची व्यवस्था करण्याचें ठरविलें आहे. चालू वर्षी ह्या कामासाठी ३१ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. मध्यवर्ती सरकारनें योजनेला मदत म्हणून २२·५ लाख रुपये देण्याचें कबूल केलें आहे.


## Deccan Institute of Commerce

**594, Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1955-56 Session on Thursday **the 23rd June 1955. Students coached up for** G. C. D., L. C. C., D. Com., C. A. ( First Part )., G. D. C. & A., C. A. I. I. B., Shorthand, Typewriting Examinations. Morning or Evening Classes. Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-Graduates and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

# अर्थ

बुधवार, ता. १ जून, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताची चीनपेक्षा अधिक प्रगति

अमेरिकेंतील स्टॅनफोर्ड विद्यापीठांतील दोघां अर्थशास्त्रज्ञांनीं भारत व चीन ह्यांच्या औद्योगिक प्रगतीचा अभ्यास करून कांहीं तौलनिक निष्कर्ष काढले आहेत. गेल्या कांहीं वर्षांत चीनच्या सरकारनें औद्योगिकरणाकडे विशेष लक्ष पुरविलें असून सुद्धां औद्योगिक उत्पादनांत भारतानें अधिक प्रगति केली आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. आपल्या तौलनिक अभ्यासांत ते म्हणतात कीं, १९५४ अखेरची परिस्थिति लक्षांत घेतां गेल्या पांच वर्षांत भारतांत दर माणसागणिक होणाऱ्या वस्तूंच्या खपांत वाढ झालेली आहे. चीनमध्यें घट झालेली आहे. ह्याचें कारण असें कीं, भारतानें भांडवली विकासाचा जो वेग स्वीकारलेला होता तो चीनपेक्षा कमी होता. भारतानें आपल्या औद्योगिक विकासाचा कार्यक्रम आंखला होता तो अधिक विविधतापूर्ण होता. उलटपक्षीं, चीननें भारी उद्योगधंद्यांवर अधिक भर दिलेला आहे. भारताच्या ह्या धोरणामुळें देशांतील शेतीच्या उत्पादनांत लक्षांत भरण्यासारखी प्रगति झाली. त्याउलट, चीनमध्यें शेतीचें उत्पादन घटत गेलेलें दिसतें. सक्तीनें कामाला लावून औद्योगिकरण करण्याचें धोरण चीननें विशेषत्वानें अमलांत आणलें. भारतानें ही पद्धत टाळली. उद्योगधंद्यांच्या विकासाच्या गतीचा विचार करतां चीन अधिक वेगानें प्रगति करीत आहे, ही गोष्ट खरी. परंतु इतकें करूनहि चीनला कित्येक वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतींत भारताची बरोबरी करतां आलेली नाहीं. परकीय मदतीचा विचार करतां, विकास–योजनांसाठी भारताला जितकी मदत परदेशांकडून मिळाली तितकी चीनला मिळालेली नाहीं.

## मद्रास राज्यांत साखरेचे कारखाने

मद्रास सरकार आपल्या राज्यांत सहकारी तत्त्वावर अनेक साखरेचे कारखाने काढण्याचा विचार करीत आहे. मद्रास राज्यांत सध्यां साखरेचे तीनच कारखाने असून एकूण गरजेपैकीं फक्त ५० टक्के गरजच ते भागवूं शकतात. राज्यांतील उसाच्या लागवडीसंबंधीं बोलतांना शेतकी–मंत्री श्री. भक्तवत्सलम् म्हणाले कीं, “ गुळाच्या बाजारांत सध्या इतका गूळ आला आहे कीं परिस्थिति चिंताजनक झाली आहे. त्यामुळें उसाची लागवड आर्थिक दृष्ट्या न परवडणारी झाली आहे. गुळाच्या किंमती अतिशय घसरल्यामुळें उसाची शेती करणारावर मोठा आघात झाला आहे. गुळाचा केवढा तरी मोठा सांठा विकला न जातां बाजारपेठेंत पडून आहे. भारतीय सरकारनें गुळाच्या निर्यातीवरील बंधनें सैल केलीं असलीं तरी त्यामुळें गुळाच्या उत्पादकांना फारशी मदत झालेली नाहीं. अशा परिस्थितींत एकच उपाय करण्यासारखा आहे, आणि तो म्हणजे उसाच्या बागाइतदारांना सहकारी तत्त्वावर साखरेचे कारखाने काढण्यास मदत करणें. राज्यांतील ज्या भागांत उसाची शेती करण्यांत येते, त्या भागांतील उसाचे मळेवाले सहकारी तत्त्वावर साखरेचे कारखाने काढण्यासाठी पुढें येत आहेत. ह्या मळेवाल्यांनीं कारखान्यासाठी जरूर असणारें भाग–भांडवल जमविण्यांत जर यश मिळविलें तर अशा स्वरूपाचे साखरेचे कारखाने काढण्याच्या कामीं मद्रास सरकार मदत करण्यास तयार आहे. ” नाणेबाजाराची सध्यांची परिस्थिति तंगीची असल्यामुळें, महाराष्ट्राप्रमाणेंच मद्रास राज्यांतहि भांडवल जमविणें कठीण होण्याचा संभव आहे.

## सुक्या केळयांचा धंदा

वसई येथील शेतकऱ्यांनीं सुक्या केळ्यांचा व्यवसाय करण्यासाठी आपली सहकारी संस्था स्थापन केली आहे. वसई–अर्नाळा भागांतील शेतकऱ्यांनीं ह्या कामांत पुढाकार घेऊन श्री. ए. एन्. म्हात्रे ह्यांना आपल्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडले आहे. संस्थेतर्फे सुकेळी तयार करण्याचीं विजेवर चालणारीं तीन यंत्रें चालू करण्यांत आलीं आहेत. खादी आणि ग्रामोद्योग–बोर्डाचे अध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं यंत्रांचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना अध्यक्ष श्री. म्हात्रे म्हणाले कीं, सरकारनें ह्या धंद्याला मदत करणें आवश्यक आहे. देशाची फाळणी झाल्यावर सुकेळी तयार करणाऱ्या शेतकऱ्यांचें पाकिस्तानमधील गिऱ्हाइक तुटलें. त्यामुळें ह्या धंद्याला प्रतिकूल परिस्थिति निर्माण झाली. तथापि शेतकऱ्यांनीं उत्साह आणि धडाडी दाखविल्यामुळें धंद्याची पुनर्घटना करणें शक्य होत आहे. ह्या धंद्याला तीन तऱ्हेचे धोके निर्माण होण्याची शक्यता आहे. सुकेळ्यांचें उत्पादन फार वाढणें हा पहिला धोका आहे. दुसरा धोका म्हणजे त्यांच्या किंमतींत भलतीच घट होणें आणि तिसरा म्हणजे निश्चित बाजारपेठांचा अभाव. ग्रामोद्योगांपैकी हा एक महत्त्वाचा धंदा आहे आणि वरील धोके टाळण्यासाठीं धंद्याच्या तंत्रांत क्रांतिकारक बदल करणें आवश्यक आहे. सुकेळ्यांना खात्रीची बाजारपेठ मिळवून देणें अतिशय आवश्यक आहे. सहकारी संस्थेनें सध्यां चालू केलेल्या यंत्रांच्या साह्यानें रोज २५० केळीं निर्जल करतां येतील.

## औद्योगिक आगींचा शोध

निष्काळजीपणानें टाकलेल्या जळत्या सिगारेटच्या थोटुक्यामुळें कित्येक वर्षांनंतर आग लागूं शकते, असें ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं आपलें मत औद्योगिक आगींबाबत अहवालांत व्यक्त केलें आहे. असें थोटुक ३० फुटांच्या ढिगाखालीं सांपडलें, तर तें धुमसत राहून मोठ्या जाळांत त्याचें रूपांतर होण्यास तीन ते चार वर्षें लागूं शकतात.

## कार्नेजी कॉर्पोरेशनच्या देणग्या

कार्नेजी कॉर्पोरेशननें ३० सप्टेंबर, १९५४ अखेर संपलेल्या वर्षी १,०८,९८,८५० डॉलर्सच्या देणग्या दिल्या. १९११ सालीं कॉर्पोरेशनची स्थापना म. अँन्ड्रू कार्नेजी ह्यांनीं केली, तेव्हांपासून आतांपर्यंतच्या देणग्यांची बेरीज २४,७८,५८,८९७ डॉलर्स होते. कॉर्पोरेशनची आजची जिंदगी १७,३५,७५,१७१ डॉलर्स इतकी आहे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

***Balance Sheet as at 31st December, 1954.***

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/-each ... | 43,560—0—0 | |
| 30005 Ordinary Shares of Rs. 50/-each ... | 15,00,250—0—0 | 15,43,810—0—0 |
| **Issued and Subscribed Capital** | | |
| 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/-each ... | 43,560—0—0 | |
| 15005 Ordinary Shares of Rs. 50/-each ... | 7,50,250—0—0 | 7,93,810—0—0 |
| **Called and Paid up Capital** | | |
| 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares @ Rs. 25/-each ... | 27,225—0—0 | |
| 15005 Ordinary Shares @ Rs. 25/-each (out of which 5 shares are fully paid) ... | 3,75,250—0—0 | |
| | 4,02,475—0—0 | |
| Less calls unpaid ... | 2,290—0—0 | |
| | 4,00,185—0—0 | |
| Add Forfeited Shares ... | Nil | 4,00,185—0—0 |
| Calls in Advance | | 290—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** | | 1,00,000—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | |
| Fixed Deposits & Recurring Deposits ... | 19,90,594-13—3 | |
| Savings Bank Deposits ... | 22,20,443-12—8 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | 12,22,015—7—7 | 54,33,054—1—6 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| (i) In India ... | Nil | |
| (ii) Outside India ... | Nil | Nil |
| Particulars: | | |
| (i) Secured (against Pledge of G. P. Notes) Nil ... | | |
| (ii) Unsecured Nil ... | | Nil |
| **5. Bills Payable:** ... | | 7,311—0—0 |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 76,730—1—0 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 76,730—1—0 |
| **7. Other Liabilities:** | | 37,410—6—3 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra** | | Nil |
| **9. Profit and Loss Account** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 23,483—6—1 | |
| Less: appropriations:— | | |
| Reserve Fund 7,000—0—0 | | |
| Dividend on 6% C. R. P. Shares 1,633—8—0 | | |
| Investment Depreciation Fund 4,000—0—0 | | |
| Contingency Fund 5,000—0—0 | | |
| Provision for Income-tax 5,849-14—1 | 23,483—6—1 | |
| | — | |
| Add profit for the year brought from the Profit and Loss Account. (subject to Municipal Tax on Premises and Income-tax) ... | 25,357—9—0 | 25,357—9—0 |
| **10. Contingent Liabilities** | | |
| In respect of partly paid shares held by the Bank on behalf of constituents Rs. 2,350—0—0 | | |
| Total Rs. ... | | 60,80,338—1—9 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

***Balance Sheet as at 31st December 1954***

## PROPERTY AND ASSETS

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (including foreign currency notes) ... | | | 4,52,699—5—10 |
| **2. Balances with Other Banks** (In current account) | | | |
| (i) In India ... | | 3,59,336—8—10 | |
| (ii) Outside India ... | | Nil | 3,59,336—8—10 |
| **3. Money At Call And Short Notice** ... | | | 2,50,000—0—0 |
| **4. Investments** (at Cost) | | | |
| Govt. Securities of the face value of Rs. 22,40,800/- (Market value Rs. 20,06,538/-) | | | |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments. ... | | 22,56,043—10—0 | |
| (ii) Shares- Ordinary Share of a Co-op. Bank, fully paid (at cost) ... | | 60—0—0 | |
| (iii) Debentures or Bonds. ... | | Nil | |
| (iv) Other Investments. ... | | Nil | |
| (v) Gold. ... | | Nil | 22,56,103—10—0 |
| **5. Advances** | | | |
| (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors). | | | |
| (i) Loans, Cash-Credits, Over-drafts, etc. | | | |
| (i) In India | 18,94,335—5—10 | | |
| (ii) Outside India | Nil | 18,94,335—5—10 | |
| (ii) Bills Discounted and Purchased (excluding Treasury Bills of the Central and State Governments). | | | |
| (i) Payable in India | 2,42,675—12—0 | | |
| (ii) Payable outside India. | Nil | 2,42,675—12—0 | 21,37,011—1—10 |
| **Particulars Of Advances** (*See Page 174*) | | | |
| **6. Bills Receivable, being Bills for Collection as per Contra** | | | |
| (i) Payable in India ... | | 76,730—1—0 | |
| (ii) Payable outside India ... | | Nil | 76,730—1—0 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations, per contra** ... | | | Nil |
| **8. Premises** (at cost) ... | | | |
| As per last Balance Sheet ... | | 3,30,619—2—0 | |
| Additions during the year ... | | 15,378—3—9 | |
| | | 3,45,997—5—9 | |
| Less Depreciation ... | | 6,370—0—0 | 3,39,627—5—9 |
| **9. Furniture and Fixtures** (at cost) | | | |
| As per last Balance Sheet ... | | 58,673—11—7 | |
| Additions during the year ... | | 2,433—7—6 | |
| | | 61,107—3—1 | |
| Less sales during the year ... | | 344—0—0 | |
| | | 60,763—3—1 | |
| Less Depreciation upto 31-12-1953 | 5,562—4—7 | | |
| during the year | 1,656—0—0 | 7,218—4—7 | 53,544—14—6 |
| **Safe Deposit Vault Equipment** (at cost) | | | |
| As per last Balance Sheet ... | | 36,997—2—0 | |
| Additions during the year ... | | 83—0—0 | |
| | | 37,080—2—0 | |
| Less Depreciation ... | | 931—2—0 | 36,149—0—0 |
| **10. Other Assets, Including Silver** | | | |
| Sundry Assets and Building Advance ... | | 28,281—11—0 | |
| Interest accrued on Govt. Securities ... | | 20,213—0—0 | |
| Income-tax deducted at source ... | | 17,560—15—0 | |
| Stock of Printing (at cost) ... | | 25,050—9—3 | |
| Library (at cost) ... | | 452—0—0 | |
| Stamps in stock ... | | 332—10—3 | |
| Branch adjustments ... | | 9,784—11—6 | |
| Due from Bank in liquidation (not provided for) ... | | 17,460—9—0 | 1,19,136—2—0 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | | Nil |
| Total Rs. ... | | | 60,80,338—1—9 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet on page 173**

| | Particulars of Advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| (i) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 14,42,912–11–8 |
| (ii) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | 1,59,202–5–9 |
| (iii) | Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties, in addition to the personal security of the debtors. ... | 5,34,896–0–5 |
| (iv) | Debts considered doubtful or bad, not provided for. ... | Nil |
| | | 21,37,011–1–10 |
| (v) | Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 1,36,307–2–6 |
| (vi) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members. ... | 83–1–0 |
| (vii) | Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 1,50,254–8–0 |
| (viii) | Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as members. ... | 5,072–1–0 |
| (ix) | Due from Banking Companies. ... | Nil |

## *Profit and Loss Account for the Year ending 31st December, 1954*

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on deposits, borrowings, etc. ... | 1,31,385–4–7 | INCOME : (Less provision made during the year for bad and doubtful debts & other usual or necessary provisions). | |
| 2. Salaries and allowances and Provident Fund. ... (including amount paid to Managing Directors Rs. 12,750–0–0) | 92,831–8–6 | 1. Interest and discount. ... | 2,56,484–7–6 |
| | | 2. Commission, exchange & brokerage. | 14,661–12–9 |
| | | 3. Rents. ... | 9,729–3–6 |
| 3. Directors' & Local Committee Members' fees and allowances. ... | 1,895–0–0 | 4. Net profit on sale of investments, gold and silver, land premises, and other assets. (not credited to reserves or any particular fund or account) | Nil |
| 4. Rent, taxes, insurance, lighting, etc. ... | 6,497–1–9 | | |
| 5. Law charges. ... | 460–0–0 | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to reserves or any particular fund or account.) ... | Nil |
| 6. Postage, Telegrams & Stamps ... | 5,295–10–9 | | |
| 7. Auditors' fees. ... | 700–0–0 | | |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property | 7,710–0–0 | | |
| 9. Stationery, printing, advertisement, etc. ... | 8,007–13–0 | 6. Income from non-banking assets, and profit from sale of or dealing with such assets. ... | Nil |
| 10. Loss from sale of or dealing with non-banking assets. ... | Nil | 7. Other receipts : ... | 6,578–3–9 |
| 11. Other expenditure | 7,313–11–11 | | |
| 12. Balance of profit (Subject to Municipal Tax on Premises and Income-tax) ... | 25,357–9–0 | | |
| Total Rs. ... | 2,87,453–11–6 | Total Rs. ... | 2,87,453–11–6 |

M. K. Ternikar, *Accountant.*

N. N. Kshirsagar, R. B. Salvekar, *Managing Directors.*

K. P. Joshi, *Chairman*
H. B. Girme, *Vice Chairman*
B. B. Walvekar, Mrs. Indumatibai R. Phadake, B. P. Kelkar, R. B. Girme, K. M. Mahajan, R. P. Damodare, *Directors.*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have examined the annexed Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited, as on 31st December, 1954, and the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the authenticated returns from Branches and report that :—

(1) We have obtained all the information and explanations we have required. (2) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law. (3) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank. (4) In our opinion the books of account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act. 1913. (5) The information and explanations required by us have been found to be satisfactory. (6) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank. (7) The returns received from Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit. (8) The Profit and Loss Account, shows a true balance of profit and Loss for the period covered by such account.

Poona,
Date 30th Jan. 1955.

KHARE and Co.,
*Chartered Accountants.*

## सहकारी मंडळांमुळें अमेरिकन शेतकऱ्यांची भरभराट

अमेरिकेंत शेतीची सहकारी मंडळें गेलीं १०० वर्षे अस्तित्वांत असून, या काळांत बदलत्या परिस्थितींतहि त्या मंडळांनीं आपली उपयुक्तता टिकवून धरली आहे आणि म्हणून अमेरिकन शेतीच्या अर्थकारणांत त्या मंडळांना कायमचें स्थान प्राप्त झालें आहे. अशीं १०,००० मंडळें अमेरिकेंत आहेत. शेतकऱ्यांना त्या मंडळांचें महत्त्व पूर्वीपेक्षा आतां अधिक वाटतें.

शेतीच्या सहकारी मंडळांनीं अगदीं आरंभीं जे प्रागतिक उपक्रम हातीं घेतले त्यांपैकीं एक म्हणजे, शेतीच्या उत्पादनाची प्रतवारी लावण्याचा आग्रह धरणें हा होता. शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढविणें हा या आग्रहाचा हेतु होता. उत्कृष्ट माल बाजारांत आणण्याकडे मंडळांनीं विशेष लक्ष दिलें, आणि गिऱ्हाइकांनींहि त्या उपक्रमाचें स्वागत केलें.

खाजगी व सरकारी वैज्ञानिकांनीं केलेल्या संशोधनाचा उपयोग शेतकऱ्यांनीं शेतीच्या व्यवहारांत करावा, अशीहि खटपट मंडळांनीं केली.

अन्नपदार्थांवर संस्कार करणें व ते बाजारांत पाठविणें हीं कामें देखील आतां शेतीच्या सहकारी मंडळांकडून केलीं जात आहेत. हीं कामें इतर एखाद्या बाहेरच्या संघटनेकडून करवून घेण्यापेक्षा स्वतःच्याच सहकारी मंडळाकडून करवून घेण्यांत शेतकऱ्याला कमी खर्च येतो.

शेतीच्या शिलकी उत्पादनासाठीं वाढती बाजारपेठ मिळवून देण्याच्या कामीं कित्येक मंडळें उपयोगी ठरत आहेत.

शेतींचें सुमारें २२ टक्के उत्पादन अमेरिकेच्या बाजारांत पाठविण्यासाठीं शेतकऱ्यांना मंडळांचा उपयोग होतो. एवढ्या उत्पादनाची किंमत १९५२–५३ सालीं ७,४०,००,००,००० डॉलर झाली, असें अमेरिकन शेती खात्याच्या शेती सहकारी मंडळ विभागाकडून कळतें.

शेतकरी लोक आपली क्रयशक्ति एकत्र करून खरेदीच्या सहकारी मंडळांमार्फत कमी किंमतींत माल विकत घेऊं शकतात. उत्पादनाला उपयोगी पडणाऱ्या मालासाठीं शेतकरी जो एकंदर पैसा खर्च करतात त्यांपैकीं सहावा भाग सहकारी पद्धतीनें खरेदी केलेल्या मालासाठीं खर्चीं पडतो. १९५२–५३ सालीं अशी सहकारी खरेदी २,००,००,००,००० डॉलरची झाली.

गेल्या दहा वर्षांत शेतकऱ्यांच्या मंडळांची सभासद-संख्या दुपटीपेक्षा अधिक वाढली आहे. १९४०–४१ सालीं ती ३४ लक्ष होती आणि १९५२–५३ सालीं ७५ लक्ष झाली.

अमेरिकेंत फक्त ५० लक्ष शेतकरी आहेत, पण शेतकऱ्यांना एकापेक्षां अधिक मंडळांचे सभासद होतां येतें आणि पुष्कळ शेतकरी निरनिराळ्या मंडळाचे सभासद झालेले असतातहि. शेतांतील पिकें बाजारपेठेंत नेणारें मंडळ, शेतीला लागणाऱ्या मालाचा पुरवठा विकत घेण्यास मदत करणारें मंडळ, कापूस पिंजणें, जनावरांची व खाद्य पक्ष्यांची वाहतूक करणें, अन्नपदार्थ गोठविण्याची सोय करणें, वगैरे कामें करणारीं मंडळें, अशा अनेक मंडळांचें सभासदत्व एकाच शेतकऱ्याला घेतां येतें.

अलिकडच्या कांहीं वर्षांत शेतकऱ्यांच्या सहकारी उपक्रमांची व्यापकता वाढत आहे, असें अमेरिकन शेती खात्याच्या सहकारी मंडळ विभागानें प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांवरून समजतें. शेतीच्या उत्पादनाची विक्री करणाऱ्या मंडळांपैकीं सुमारें ५८ टक्के मंडळें आपल्या सभासदांना लागणाऱ्या कांहीं मालाचा पुरवठाहि करीत असतात, आणि याउलट माल खरेदी करणाऱ्या मंडळांपैकीं २० टक्क्यांपेक्षा अधिक मंडळें कांहीं उत्पादित मालाची विक्रीहि करीत असतात.

शेतकरी लोक आपल्या सहकारी मंडळांना निरनिराळ्या प्रकारचीं कार्यें अंगावर घेऊन कामाचा व्याप वाढविण्यास सांगत असतात. असें केल्यानें सभासदांच्या पैशाची बचत होते आणि एकाच ठिकाणीं सर्व व्यवहार करणें सोयीचेंहि असतें.

अमेरिकेंतील सहकारी मंडळांचा उगम अमेरिकेच्या इतिहासांतील आरंभींच्या काळांत सांपडूं शकतो. त्या काळीं विक्रीच्या ठिकाणीं लांकडाचे ओंडके ढकलत नेण्यासाठीं आणि सगळ्या शेताची मळणी करण्यासाठीं सर्व शेतकरी सहकार्य करीत असत.

१९५२–५३ सालीं अमेरिकेंतील तीन–पंचमांश शेतकरी सहकारी मंडळांचे सभासद होते, आणि सध्यां तर ती संख्या आणखी वाढली आहे असें सरकारच्या प्राथमिक आंकड्यांवरून दिसतें. शेतकऱ्यांचीं सहकारी मंडळें जोंपर्यंत अमेरिकेंतील शेतकऱ्यांच्या गरजा उत्तम प्रकारें भागवीत रहातील तोंपर्यंत त्यांच्या वाढीला उत्तेजन मिळत जाईल यांत शंका नाहीं.

---

**ग्रामीण भागांत रेडिओची सोय**—बिहारमधील ज्या खेड्यांची वसती १,००० पेक्षा अधिक आहे, त्या खेड्यांतील सार्वजनिक संस्थांतून रेडिओ ठेवण्याची योजना राज्यसरकारनें आंखली आहे. पाटणा रेडिओ केंद्राच्या ध्वनींच्या कक्षेत जीं खेडीं येतील त्या खेड्यांत रेडिओ पुरविण्यांत येणार आहेत.

**ग्रामीण भागांत पतपेढ्या**—ग्रामीण भागांतील जनतेला पतीवर व्यवहार करतां यावे म्हणून मद्रास सरकारनें राज्यांतील ग्रामीण भागांत १९ पतपेढ्या स्थापन करण्याचें ठरविलें आहे. २५,००० रुपयांचें भाग–भांडवल असलेल्या ४ बँका ह्यापूर्वींच सुरू करण्यांत आल्या आहेत. जूनअखेर प्रत्येक जिल्ह्यांत अशा दोन बँका उघडण्यांत येतील.

---


# B. M. College of Commerce, Poona—4

The College will open for the new academic year on 20th June 1955. Students desirous of taking the Commerce Course after their S. S. C. examination should apply immediately in the prescribed form with the admission fee of Rs. 32/-. The Prospectus giving detailed information about the courses and rules of admission to different classes can be obtained from the office for six annas.

Under new ordinances of the Poona University, a Commerce Graduate can appear for B. A. examination without keeping terms in an arts college. Graduates in Arts with Economics (Special and Hons.) of the Poona University can appear for the B. Com. examination after keeping two terms in this College.

T. M. JOSHI,
Principal.

## अमेरिकेंत जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची वाढती संख्या

अमेरिकेंतील कॉलेजांत दाखल झालेल्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या गेल्या तीन वर्षांत वाढत आहे. सध्यां ती संख्या १,७०० ते १,८०० पर्यंत पोंचली आहे.

"इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन" नें अलीकडेच पूर्ण केलेल्या समीक्षणावरून असें दिसतें कीं, तीन वर्षांपूर्वी दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा सध्यांची संख्या सुमारें ४०० नें अधिक आहे, आणि दहा वर्षांपूर्वी अमेरिकेंत अभ्यासासाठीं आलेल्या विद्यार्थ्यांच्या २० पट विद्यार्थी सध्यां अमेरिकेंत शिकत आहेत.

"इन्स्टिटयूट" च्या अहवालांत असें सांगितलें आहे कीं, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या संख्येचें प्रमाण ६ : १ असें आहे, पण दरवर्षी विद्यार्थिनींची संख्या वाढत आहे.

भारतीय विद्यार्थी ज्या शैक्षणिक क्षेत्रांची निवड करतात त्यांचें निरीक्षण केलें असतां असें दिसतें कीं, इंजिनियरिंगचें क्षेत्र फार लोकप्रिय आहे, आणि त्या क्षेत्रांत यांत्रिक, रासायनिक व विद्युत्शास्त्रीय अभ्यासक्रम घेणाऱ्यांची संख्या सर्वांत अधिक आहे. प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, गणितशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र हीं क्षेत्रें इंजिनियरिंगच्या खालोखाल लोकप्रिय आहेत.

त्यानंतरच्या अनुक्रमांत सामाजिक शास्त्रें, वैद्यक शास्त्र, वाङ्मय, व्यापार, शेतकी व शिक्षणशास्त्र यांची लोकप्रियता दिसून येते.

भारतीय वकिलातीच्या माहितीप्रमाणें, अमेरिकेंत भारतीयांचें मोठ्यांत मोठें केंद्र म्हणजे मिशिगन विद्यापीठ आहे. तेथें या वर्षी ७५ भारतीय विद्यार्थी आहेत. एकाच विभागांतील जास्तींत जास्त विद्यार्थि-संख्या न्यूयॉर्क शहरांतील कॉलेजांमध्यें आढळते. त्या विभागांत १०० पेक्षां अधिक भारतीय विद्यार्थी आहेत. त्यांपैकीं सुमारें निम्मे विद्यार्थी न्यूयॉर्क विद्यापीठांत जातात, आणि बाकीच्यांपैकीं बहुसंख्य विद्यार्थी कोलंबिया विद्यापीठांतील आहेत.

भारतीय विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीनें विस्कॉन्सिन विद्यापीठाचाहि अनुक्रम बराच वर लागतो. ५० पेक्षा थोडेसे अधिक भारतीय विद्यार्थी त्या विद्यापीठांत आहेत. इलिनॉय व दक्षिण कॅलिफोर्निया विद्यापीठांतील भारतीय विद्यार्थ्यांची संख्या त्यापेक्षा कांहींशी कमी आहे.

"मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी" या संस्थेंत ४१ भारतीय विद्यार्थी असून, कॅलिफोर्निया, कॉर्नेल, व हार्वर्ड विद्यापीठांत आणि "वॉशिंग्टन स्टेट कॉलेजां" त प्रत्येकीं ३३ आहेत.

भारतीय वकिलातीच्या माहितीप्रमाणें, शिकागो, मिशिगन स्टेट, ओहायो स्टेट व पर्डयु विद्यापीठें हीं देखील भारतीय विद्यार्थ्यांत लोकप्रिय आहेत. इतर कित्येक शिक्षणसंस्थांत प्रत्येकीं फक्त दोन किंवा तीन भारतीय विद्यार्थी असून, दहावीस कॉलेजांत तर अवघा एक एक भारतीय विद्यार्थी आहे.

ते विद्यार्थी भारताच्या सर्व भागांतून आलेले असले तरी, मोठ्या लोकसंख्येच्या ठिकाणांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वांत अधिक असते. भारतीय विद्यार्थी अमेरिकेंत साधारणपणें दोन ते चार वर्षे घालवितात.

चालू वर्षी फुलब्राइट व स्मिथ-मंड शिष्यवृत्त्यांसारखें अमेरिकन पुरस्कार घेऊन ४० ते ५० विद्यार्थी अमेरिकेला गेले असले तरी, बहुतेक भारतीय विद्यार्थी स्वखर्चानें अमेरिकेस जातात. बरेच जण खाजगी संस्थांच्या मदतीनें अमेरिकेस जातात, आणि सध्यां भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या घेऊन गेलेले सुमारें २० विद्यार्थी अमेरिकेंत आहेत.

"इंटरनॅशनल इन्स्टिटयूट" च्या अहवालाप्रमाणें, अमेरिकेंत शिकणाऱ्या परकीय विद्यार्थ्यांत भारतीय विद्यार्थ्यांचा अनुक्रम संख्येच्या दृष्टीनें तिसरा लागतो. कॅनडाचा अनुक्रम पहिला व राष्ट्रीय चीनचा दुसरा आहे. या वर्षी अमेरिकेंतील सर्व परकीय विद्यार्थ्यांची एकंदर संख्या सुमारें ३४,००० आहे, असा अंदाज करण्यांत आला आहे.

---

### भारताचे परराष्ट्रांशीं करार हिंदींत होणार

ह्यापुढें भारत इतर देशांबरोबर जे करार करील, ते दुसऱ्या देशांची भाषा, इंग्रजी व हिंदी अशा तीन भाषांतून लिहिले जातील. जपानशीं होणाऱ्या हवाई वहातुकीविषयक करारापासून ह्यास प्रारंभ होईल; त्या कराराचा मसुदा हिंदी, जपानी व इंग्रजी भाषांतून तयार करण्यांत आला आहे. मतभेद झाल्यास, इंग्रजी भाषेंतील मसुदा ग्राह्य धरला जाईल.

---

### वेस्टर्न इंडियाच्या नव्या डायरेक्टर : सुमित्रादेवी राणीसाहेब भोसले

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावर श्री. सुमित्रादेवी राणीसाहेब भोसले, सातारा, ह्यांची निवड करण्यांत आली आहे. ह्या सन्मानाबद्दल सातारा येथील अनेक महिला संस्थांनीं राणीसाहेबांचा सत्कार केला.

---

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयांत आलेलीं नवीन पुस्तकें

( १ ) **आपले पक्षी**—लेखक श्री. माधव राऊत, निसर्ग-दर्शनमाला, पुस्तक क्र. १, प्रकाशक बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, ११४ अपोलो रस्ता, फोर्ट, मुंबई नं. १. (१९५४).

( २ ) **सह्याद्रि**—लेखक स. आ. जोगळेकर, प्रकाशक य. गो. जोशी, प्रसार प्रकाशन ६२३-१५ सदाशिव पेठ, पुणें नं. २, पृष्ठसंख्या ५०९, मूल्य रु. १०.

( ३ ) **वनस्पति-जीवन**—लेखक श्री. ल. आजरेकर, नवभारत ग्रंथमाला, सुविचार प्रकाशन मंडळ लिमिटेड, पुणें. पृष्ठसंख्या २००, मूल्य रु. २.

( ४ ) **नक्षत्र दर्शन**—लेखक स. गो. ढवळे, ज्योतिष-शिक्षणमहाविद्यालय प्रकाशन, पृष्ठसंख्या ८२, मूल्य रु. ५.

( ५ ) **आपलीं खेडीं**—महाराष्ट्र टिळक विद्यापीठ मराठी शास्त्रीय ग्रंथमंडळ, लेखक द. ल. सहस्रबुद्धे, पृष्ठसंख्या २३६, मूल्य रु. ३.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.